गोपनीय

चंद्रपूर व गडचिरोली किंवा इतर जिल्ह्याच्या विकासाकरिता विशेष कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी.

---

कार्यक्षम अधिकारी नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९२/सीएम-१०/प्र.क्र. २/९२/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ जुलै, १९९४.

पहा :- १] शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९०/प्र.क्र. ११/९०/बारा, दिनांक ७ जानेवारी, १९९१.

२] शासन परिपत्रक, क्रमांक-एसआरव्ही-१०९२/सीएम-१०/प्र.क्र. २/९२, दिनांक, ११ फेब्रुवारी, १९९२.

## शु द्धी प त्र क

आदिवासी भागातील कार्यालयात उत्साही, तरुण व कार्यक्षम अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात यावी तसेच जे शासकीय सेवक आदिवासी क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षे चांगली सेवा पूर्ण करतील, त्यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करताना त्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

"शासकीय सेवकाने आदिवासी क्षेत्रात किमान ५ वर्षे चांगली सेवा केल्यानंतर त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली मागितली तर त्या सेवकास अग्रहक्काने पसंतीच्या ठिकाणी नेमणूक देण्याबाबत सक्षम प्राधिका-यांनी प्रशासकीय सोयी लक्षात घेवून अशा सेवकाच्या त्यांच्या पसंतीक्रमानुसार बदल्या करण्याबाबत शक्यतो विचार करावा."

२. तसेच शासन परिपत्रक, दिनांक ११ फेब्रुवारी, १९९२ मधील परिच्छेद-२ मध्ये शेवटच्या वाक्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

"ज्या जिल्ह्यामध्ये विशेष कृती कार्यक्रम राबविला जातो त्या जिल्ह्यांतर्गत निरनिराळ्या सेवेतील पदावर नियुक्ती करताना ४५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयोगटातील कार्यक्षम अधिकारी शक्यतो

कृमाप...

नि

नियुक्त करण्यात यावेत. मात्र विशेष कृषि कार्यक्रमाशी संलग्न नसलेल्या अन्य सेवेमध्ये किंवा पदावर प्रशासकीय कारणास्तव नियतकालिक बदल्या करताना हे निर्बंध लागू करु नयेत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ य. मा. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] राज्यपालांचे सचिव,

२] मुख्यमंत्री यांचे सचिव,

३] शासनाचे मुख्य सचिव,

४] शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव,

५] उप/सह सचिव, मंत्रालयीन विभाग[आस्थापना शाखा].